(**<u>इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद</u>**)

[२०२३] ३ एस. सी. आर. ५९८

भारताचे संघराज्य आणि इतर

-विरुद्ध-

परषोत्तम दास

(दिवाणी अपील क्रमांक ४४७/२०२३)

२१ मार्च २०२३

(न्यायमूर्ति संजय किशन कौल, न्यायमूर्ति बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ति अभय एस. ओक)

भारतीय राज्यघटना - अनुच्छेद २२६- तिन्ही सशस्त्र बल सदस्यांच्या सेवा संबंधित प्रकरणे- सशस्त्र बल न्यायाधिकरणाने पारित केलेला आदेश भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत रिट अधिकारक्षेत्रात कोणत्याही उच्च न्यायालयासमोर आव्हान देण्यास सक्षम असेल की नाही - निर्णीत :- मेजर जनरल श्री कांत शर्मा आणि इतर प्रकरणातील निकालात योग्य कायदा विहित करण्यात आला नाही आणि सदर निकाल एल. चंद्रकुमार प्रकरण, एस. एन. मुखर्जी प्रकरण आणि रोजर मॅथ्यू प्रकरणासह आधी आणि नंतर देण्यात आलेल्या घटनापीठांच्या निकालांशी विसंगत आहे, सदर प्रकरणांमध्ये हे अतिशय स्पष्टपणे नमूद केले होते की उच्च न्यायालयाद्वारे राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत मिळालेल्या अधिकाराच्या वापरावर कोणतेही निर्बंध नाहीत-तथापि, स्व-शिस्तीच्या प्रकरणांच्या संदर्भात, सर्वोच्च न्यायालयाने आधीच तत्त्वे स्पष्ट केली आहेत.

भारतीय राज्यघटना - अनुच्छेद २२६ आणि २२७ - अंतर्गत स्पष्टीकरण- हे स्पष्ट केले जाते की राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयाचे अधिकार हे अनुच्छेद २२७ द्वारा बाधित व अधिक्षित आणि नियंत्रित करता येत नाही हे अधिकार अनुच्छेद २२६ अंतर्गत न्यायिक पुनर्विलोकनाच्या अधिकारांपेक्षा काहीसे वेगळे आहेत.

अपील आणि रिट याचिकेचा निपटारा करताना, न्यायालयाने

निर्णय दिला की :- १. या न्यायालयाला सशस्त्र बलांनी बजावलेल्या भूमिकेचे महत्त्व आणि या सेवांसाठी आवश्यक असलेल्या शिस्तीच्या पातळीची जाणीव आहे. अशा प्रकारे,

अनेकदा इतर न्यायाधिकरणांची अनेक न्यायशास्त्रीय तत्त्वे सशस्त्र सेना न्यायाधिकरणाच्या निर्णयांमध्ये समाविष्ट केली जाऊ शकत नाहीत. सशस्त्र बलांचे स्वतःचे नियम आणि १६ कार्यपद्धती आहेत आणि जर सशस्त्र बलांच्या निकषांनुसार अधिकारक्षेत्राचा योग्य वापर होत असेल, तेव्हा सशस्त्र बलाने बजावलेल्या भूमिकेचे महत्त्व लक्षात घेऊन, त्यात हस्तक्षेप करताना उच्च न्यायालय किंवा ह्या न्यायालयाने सावधगिरी बाळगली आहे.[परिच्छेद २४] [६११-एच (H); ६१२ -ए(A)-बी(B)]

२. हे न्यायालय उपरोक्त तत्त्वाशी सहमत असले तरी, हे न्यायालय मेजर जनरल श्री कांत शर्मा आणि इतर यांच्या प्रकरणातील निरीक्षणांचे विवेचन करू शकत नाही, ज्याने घटनेच्या कलम २२६ अंतर्गत अधिकारक्षेत्राच्या वापरावर निर्बंध घालण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे राज्यघटनेची एक अतिशय महत्त्वाची तरतूद कमकुवत झाली जी मूलभूत संरचनेचा भाग देखील आहे. मूलभूत संरचनेची तत्त्वे काळाच्या कसोटीवर टिकून राहिली आहेत आणि अनेक न्यायिक अधिघोषणांमध्ये निर्णायक चाचणी म्हणून त्यावर जोर दिला आहे. ही शंका घेण्यासारखी गोष्ट नाही. ही स्थिती असल्याने, न्यायाधिकरणाच्या आदेशावरून उद्भवलेल्या निर्णयाचा न्यायिक पुनर्विलोकन करताना राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत दिलेल्या या अधिकारक्षेत्राचा वापर करण्यासाठी उच्च न्यायालयाला अटकाव निर्माण करणे हे राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयाने स्वनियंत्रण ठेवणे या पेक्षा काहीसे वेगळे आहे. [परिच्छेद २५] [६१२ बी(B)-डी(D)]

३. विधिमंडळाने 'न्यायाधिकरण' ही संकल्पना सादर केल्यावर (एखादी व्यक्ती असे म्हणू शकते की या संकल्पनेने वेगवेगळ्या न्यायाधिकरणांच्या संबधात अनेक प्रश्नचिन्ह बघितले आहेत, जरी त्यायोगे काही यश देखील मिळवले आहे), एल. चंद्रकुमार प्रकरणात या न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर त्याची चाचणी घेण्यात आली. अशा प्रकारे, अनुच्छेद ३२३ ए किंवा अनुच्छेद ३२३ बी अंतर्गत "न्यायाधिकरण" ची तत्त्वे कायम ठेवत असताना, न्यायाधिकरणांचे निर्णय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राच्या अधीन असतील आणि ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे प्रतिबंधित केले जाणार नाहीत, ज्याद्वारे उपरोक्त दोन अनुच्छेद सादर केले. त्यामुळे, या न्यायालयाच्या

दृष्टीने, हे प्रकरण शांत व्हायला हवे होते आणि सातपेक्षा कमी न्यायाधीशांच्या कोणत्याही खंडपीठाने या प्रस्तावावर शंका घ्यायला नको होती. मेजर जनरल श्री कांत शर्मा आणि इतर प्रकरणातील निरीक्षणांमुळे रोजर मॅथ्यू प्रकरणातील सशस्त्र दल न्यायाधिकरणातील पाच न्यायाधीशांच्या खंडपीठातील निरीक्षणांची निर्मिती झाली. अशा प्रकारे, याचा पुनरुच्चार केला जातो आणि स्पष्ट केले जाते की राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयाचे अधिकार हे अनुच्छेद २२७ द्वारा बाधित व अधिक्षित आणि नियंत्रित करता येत नाही हे अधिकार अनुच्छेद २२६ अंतर्गत न्यायिक पुनर्विलोकनाच्या अधिकारांपेक्षा काहीसे वेगळे आहेत. [परिच्छेद २६] [६१२-ई-जी EG; ६१३-ए A]

४. अनुच्छेद २२६ अंतर्गत अधिकारक्षेत्राचा वापर करताना, सशस्त्र बल न्यायाधिकरणाने केलेल्या चूकीमध्ये दुरुस्ती करण्यास उच्च न्यायालयाला मज्जाव करणे हे घटनात्मकतेच्या विरोधात आहे. प्रथम स्वतंत्र न्यायिक छाननी ही केवळ सशस्त्र बल न्यायाधिकरणाद्वारेच केली जाते. काही प्रकरणांमध्ये न्यायिक पछाननी हे दुसरे अपील करण्यासारखे आहे, असे म्हणणे, त्याकडे पाहण्याचा योग्य मार्ग नसेल. हे लक्षात ठेवायला पाहिजे की प्रशासकीय न्यायशास्त्रात किमान दोन स्वतंत्र न्यायिक छाननी नाकारल्या जाऊ नयेत. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना अफाट अनुभव असतो. कलम २२६ अंतर्गत अधिकारक्षेत्राच्या कोणत्याही वापरामध्ये, उच्च न्यायालये अधिकारक्षेत्राच्या व्याप्ती आणि स्वरूपाबद्दल अगदी जागरूक असतात, जे त्या प्रकरणाच्या स्वरूपावर अवलंबून असते. [परिच्छेद २८] [६१३-ई - जीE-G]

५. एडिशनल सॉलिसिटर जनरल यांनी सुचवल्याप्रमाणे, राज्यघटनेच्या कलम २२६ अंतर्गत न्यायिक पुनर्विलोकनाच्या कक्षेतून काही प्रकरणे वेगळे करण्याची आवश्यकता नाही. एस. एन. मुखर्जी प्रकरणातील घटनापीठाने दिलेल्या निकालात असे स्पष्ट करण्यात आले होते की, लष्करी न्यायालयच्या संदर्भातही, उच्च न्यायालय त्यात अभिप्रेत असल्याप्रमाणे विशिष्ट परिस्थितीत योग्य दिलासा देऊ शकते, म्हणजे, "जर उक्त कार्यवाहीमुळे संविधानाच्या भाग ३ अंतर्गत हमी दिलेले मूलभूत अधिकार नाकारले गेले असतील किंवा जर उक्त कार्यवाही अधिकारक्षेत्रातील त्रुटीमुळे किंवा अभिलेखामध्ये दिसणाऱ्या कायद्याच्या कोणत्याही त्रुटीमुळे ग्रस्त असेल तर."[परिच्छेद २९] [६१३-जी एच GH; ६१४-ए-बीA-B]

६. वरील स्थितीत एखादा पक्षकार दिलासा मिळण्यापासून पासून वंचित राहत असेल तर अशी परिस्थिती न्यायालय कसे चालवून घेईल ? या न्यायालयाने याउलट काही बोलणे किंवा एस. एन. मुखर्जी प्रकरणातील घटनापीठाने दिलेल्या निकालात नमूद केलेल्या उपरोक्त निरीक्षणावर निर्बंध घालणे कायदेशीर किंवा योग्य ठरणार नाही. हे न्यायालय कोणतेही अपवाद तयार करण्यास तयार नाही, ज्यात एडिशनल सॉलिसिटर जनरल यांनी वर नमूद केलेल्या गोष्टींचा समावेश आहे, कारण प्रकरणाचे स्वरूप विचारात न घेता, जर संविधानाच्या भाग III अंतर्गत मूलभूत अधिकार नाकारला गेला असेल किंवा अभिलेखामध्ये अधिकारक्षेत्रातील त्रुटी किंवा त्रुटी स्पष्ट असतील तर उच्च न्यायालय आपल्या अधिकारक्षेत्राचा वापर करू शकते. उच्च न्यायालय पुराव्यांचे पुन्हा विवेचन करेल ज्यामुळे ते दुसरे अपील वगैरे होईल अशी चुकीची कल्पना असल्याचे दिसते. या न्यायालयाचा असा विश्वास आहे की उच्च न्यायालये कोणत्या निकषांनुसार अधिकारक्षेत्राचा वापर करायचे आहेत याबद्दल अगदी जागरूक आहेत आणि त्या तत्त्वांचाही या न्यायालयाने आधीच उल्लेख केला आहे.[परिच्छेद ३०] [६१४-बी-ई B-E]

७. या न्यायालयाला असा निष्कर्ष काढण्यात अजिबात संकोच वाटत नाही की मेजर जनरल श्री कांत शर्मा आणि इतर प्रकरणातील निकालात योग्य कायदा विहित करण्यात आला नाही आणि सदर निकाल एल. चंद्रकुमार प्रकरण, एस. एन. मुखर्जी प्रकरण आणि रोजर मॅथ्यू प्रकरणासह आधी आणि नंतर देण्यात आलेल्या घटनापीठांच्या निकालांशी विसंगत आहे, सदर प्रकरणांमध्ये हे अतिशय स्पष्टपणे नमूद केले होते की उच्च न्यायालयाद्वारे राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत मिळालेल्या अधिकाराच्या वापरावर कोणतेही निर्बंध नाहीत-तथापि, स्व-शिस्तीच्या प्रकरणांच्या संदर्भात, सर्वोच्च न्यायालयाने आधीच तत्त्वे स्पष्ट केली आहेत. [परिच्छेद ३२] [६१४-एफ-जी F-G; ६१५-ए A]

एल. चंद्रकुमार -विरुद्ध - भारताचे संघराज्य आणि इतर **(१९९७) ३ एस. सी. सी. २६१:** [१९९७] **२ एस. सी. आर. ११८६;** एस. एन. मुखर्जी -विरुद्ध -भारताचे संघराज्य **(१९९०) ४ एस. सी. सी. ५९४:** [१९९०] **११ सप्लीमेंट. एस. सी. आर.४४;** रोजर मॅथ्यू वि. साउथ इंडियन बँक लिमिटेड आणि इतर. **(२०२०) ६ एस. सी. सी. १:** [२०१९] **१६ एस. सी. आर. १-अनुसरण केले.**

लेफ्टनंट कर्नल पृथ्वीपाल सिंग बेदी इत्यादी -विरुद्ध - भारताचे संघराज्य आणि इतर **(१९८२) ३ एस. सी. सी. १४०: [१९८३] १ एस. सी. आर ३९३;** केशवानंद भारती -विरुद्ध -केरळ राज्य **ए. आय. आर. १९७३ एस. सी. ई. १४६१: [१९७३] पूरक. एस. सी. आर. १-संदर्भित.**

युनियन ऑफ इंडिया आणि इतर -विरुद्ध - मेजर जनरल श्री कांत शर्मा आणि इतर . **(२०१५) ६ एस. सी. सी. ७७३: [२०१५] ४ एस. सी. आर. ६७६- योग्य कायदा नाही असे निर्णीत**

<u>निर्णयविधी संदर्भ</u>

[१९८३] १ एस. सी. आर. ३९३	**संदर्भित**	**परिच्छेद १**
[१९९७] २ एस. सी. आर. ११८६	**अनुसरण केले**	**परिच्छेद ४**
[१९७३] पूरक. एस. सी. आर. १	**संदर्भित**	**परिच्छेद ५**
[१९९०] ११ पूरक. एस. सी. आर. ४४	**अनुसरण केले**	**परिच्छेद १२**
[२०१९] १६ एस. सी. आर. १	**अनुसरण केले**	**परिच्छेद १५**
[२०१५] ४ एस. सी. आर. ६७६	**योग्य कायदा नाही असे निर्णीत**	**परिच्छेद १३**

दिवाणी अपील अधिकारिता :- दिवाणी अपील क्रमांक ४४७/२०२३.

सी. डब्ल्यू. पी. क्रमांक ६६२/२०१२ मध्ये पंजाब आणि हरियाणा, उच्च न्यायालय, चंदीगड यांच्या दिनांक ३१.०१.२०१३ चा निकाल आणि आदेशावरून.

सह

दिवाणी अपील क्र. ४५७, १८०७/२०२३, ५३२७/२०१५, ४४९,४४८, ४५०, ४५१, ४५२, ४८३, ४५४, ४५३/२०२३ आणि रिट पिटिशन (सी) क्र. ७६/२०१६.

पक्षकारांकरीता उपस्थित असलेले अधिवक्ता - आर. वेंकटरामणी, ए. जी., के. एम. नटराज, संजय जैन, ए. एस .जी, आर. बाला, श्रीमती सोनिया माथूर, वरिष्ठ

अधिवक्ता, ब्रज किशोर मिश्रा, मंजू जेटली, के. परमेश्वर, श्रीमती आरती गुप्ता, श्रीमती कांति, मुकेश कुमार शर्मा, श्रीमती सीमा बेनगनी, पद्मेश मिश्रा, युवराज शर्मा, आनंद वेंकटरामणी,श्रीमती विजयालक्ष्मी वेंकटरामणी, विनायक मेहरोत्रा, श्रीमती मानसी सूद, चितवन सिंघल, श्रीमती सोनाली जैन, अभिषेक कुमार पांडे, रमण यादव, अरविंद कुमार शर्मा, सिद्धांत कोहली, निशंक त्रिपाठी, श्रीमती तान्या अग्रवाल, अर्काज कुमार, श्रीमती हर्षिता सुखिजा, श्रीमती अशीमा गुप्ता, आकाश किशोर, मुकेश कुमार मारोरिया, श्रीमती अर्चना पाठक दवे, राकेश दहिया, सत्यवान कुंडलवाल, अक्षत जैन, श्रीकांत निलाप्पा तेरडाल, अधिवक्ता.

न्यायमूर्ति संजय किशन कौल द्वारा दिला गेलेला न्यायालयाचा निर्णय खालील प्रमाणे:-

सशस्त्र बल न्यायाधिकरण अधिनियम, २००७ ची प्रस्तावना:

१. भारतीय संघराज्याच्या तीन सशस्त्र बल सदस्यांच्या सेवा प्रकरणांशी संबंधित अनेक प्रकरणे बऱ्याच काळापासून न्यायालयांमध्ये प्रलंबित होती आणि त्यामुळे केंद्र सरकार संरक्षण बलातील कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र न्यायिक मंच स्थापन करण्याच्या प्रश्नाबाबत विचाराधीन होते. १९८२ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने **लेफ्टनंट कर्नल पृथ्वीपाल सिंग बेदी इत्यादी -विरुद्ध- भारताचे संघराज्य आणि इतर** [१] या प्रकरणात केंद्र सरकारला सेवा प्रकरणांमध्ये किमान एक न्यायिक पुनर्विलोकन असावे अशी तजवीज करण्यासाठी पावले उचलण्याची विनंती केली होती आणि १९९२ मध्ये संसदेच्या प्राक्कलन समितिच्या १९ व्या अहवालात सुद्धा याची गरज असल्याचे नमूद केले होते.

२. सशस्त्र सेवांमधील न्याय प्रशासनाच्या तत्कालीन विद्यमान प्रणालीमध्ये सेवा प्रकरणांशी संबंधित तक्रारींविरूद्ध वैधानिक तक्रारी सादर करण्याची आणि लष्करी-न्यायालयीन निष्कर्ष आणि शिक्षेच्या विरोधात विविध प्राधिकरणांना पुष्टीकरणपूर्व आणि नंतरच्या याचिकांची तरतूद होती. अशा प्रकारे, तिन्ही सेवांच्या सदस्यांमधील विश्वास आणि आत्मविश्वास बळकट करण्यासाठी स्वतंत्र सशस्त्र सेना न्यायाधिकरणाची स्थापना करण्यात आली. लष्करी-न्यायालयाच्या निकालांविरुद्ध कायद्याच्या मुद्द्यांवर आणि तथ्यांवर

न्यायालयीन अपील करण्याची तरतूद करण्यासाठी एक विधेयक सादर करण्यात आले होते, ज्याच्या अभावामुळे या न्यायालयाकडून प्रतिकूल टिप्पण्या करण्यात आल्या होत्या. हे विधेयक अखेरीस मंजूर झाल्यानंतर, सशस्त्र बल न्यायाधिकरण अधिनियम, २००७ (यापुढे 'उक्त कायदा' म्हणून संदर्भित) १५.०६.२००८ पासून लागू झाला आणि त्यानंतर त्यात काही सुधारणा करण्यात आल्या.

<u>कायदेशीर अडचणः</u>

३. हा कायदा अंमलात आल्यानंतर त्याच्या अंमलबजावणीदरम्यान विविध समस्या उद्भवल्या. सशस्त्र बल न्यायाधिकरणाने पारित केलेला आदेश भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत रिट अधिकारक्षेत्रात कोणत्याही उच्च न्यायालयासमोर आव्हान देण्यास सक्षम असेल की नाही हा एक मुद्दा आमच्यासमोर विचाराधीन आहे. या मुद्द्याबाबत आम्हाला अनेक बाबींवर विचार करणे आवश्यक आहे आणि या प्रस्तावावरील निर्णयामुळे या वेगवेगळ्या बाबींमध्ये काही परिणामी आदेश पारित केले जातील. विशेष म्हणजे, या मुख्य प्रकरणासह इतर काही प्रकारणांमध्ये, असे दिसून येते की भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत अधिकारक्षेत्र वापरण्याचा आक्षेप उच्च न्यायालयासमोर देखील उपस्थित केला गेला नव्हता, यद्यपि त्याचा वापर करण्याबाबत आमच्यावर हल्लाबोल झाला.

<u>खाजगी पक्षकारांच्या वतीने सादर केलेले निवेदनः</u>

४. विविध सशस्त्र बलांमध्ये कार्यरत असलेल्या व्यक्तिंच्या वतीने ज्येष्ठ वकील अरविंद दातार आणि विद्वान वकील के. परमेश्वर यांनी युक्तिवादाचे सूत्र हाती घेतले. त्यांनी ठामपणे असा युक्तिवाद केला की भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयाद्वारे अधिकारक्षेत्राच्या वापरास कधीही अडथळा येऊ शकत नाही, जरी, कधीकधी, उच्च न्यायालय तारतम्यबुद्धीद्वारे आपल्या अधिकारक्षेत्राचा वापर करत नाही. त्यांनी **एल. चंद्रकुमार -विरुद्ध- भारताचे संघराज्य आणि इतर**[२] या प्रकरणातील या न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या घटनापीठाच्या निर्णयावर भर दिला, ज्यात स्पष्टपणे असे मत व्यक्त केले गेले होते की अनुच्छेद २२६ अंतर्गत न्यायिक पुनर्विलोकनाचे अधिकार हे राज्यघटनेच्या मूलभूत संरचनेचा भाग आहेत आणि न्यायाधिकरण जे राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२३ ए[३] किंवा ३२३ बी[४] अंतर्गत स्थापन केले गेले आहेत त्यांचे सर्व निर्णय,

राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयाच्या रिट अधिकारक्षेत्राच्या अधीन असतील.

५. **एल. चंद्रकुमार** [५] या प्रकरणातील चर्चेचा संदर्भ **केशवानंद -भारती- विरुद्ध केरळ राज्य**[६] या मुख्य प्रकरणातील या न्यायालयाच्या निकालामध्ये देण्यात आला आणि त्यानंतरच्या इतर अनेक निकालांमध्ये देण्यात आला. **एल. चंद्रकुमार**[७] च्या परिच्छेद ६२ मधील चर्चा खाली उद्धृत करणे उपयुक्त ठरेलः

"६२. केशवानंद भारती प्रकरणात, तेरा न्यायाधीशांच्या घटनापीठाने, ७ :६ च्या बहुमताने असे मत व्यक्त केले की, जरी अनुच्छेद ३६८ नुसार संसदेला संविधानात सुधारणा करण्याचा अधिकार आहे, तरी त्या अधिकाराचा वापर संविधानाच्या मूलभूत वैशिष्ट्यांना हानी पोहोचवण्यासाठी किंवा त्याची मूलभूत रचना नष्ट करण्यासाठी केला जाऊ शकत नाही. आपल्या राज्यघटनेची मूलभूत रचना असलेल्या वैशिष्ट्यांची ओळख हा भारतीय घटनात्मक कायद्यातील मोठ्या चर्चेचा विषय राहिला आहे. बहुमतासाठीचे निर्णयही या पैलूवर एकमताने मान्य केले जात नाहीत या वस्तुस्थितीमुळे अडचण आणखी वाढली आहे. [मुख्य न्यायमूर्ती सिक्री, न्यायमूर्ती शेलत आणि ग्रोवर, न्यायमूर्ती हेगडे आणि मुखर्जी, न्यायमूर्ती जगनमोहन रेड्डी आणि खन्ना यांनी बहुमतासाठी पाच निर्णय दिले. परंतु न्यायमूर्ती खन्ना यांनी मूलभूत वैशिष्ट्यांची यादी करण्याचा प्रयत्न केला नाही, तर इतर न्यायाधीशांनी मूलभूत वैशिष्ट्यांची ओळख न्यायालयाच्या निकालांच्या खालील परिच्छेदात निर्दिष्ट केली आहेः मुख्य न्यायमूर्ती सिक्री, (परिच्छेद २९२), न्यायमूर्ती शेलत आणि ग्रोवर, (परिच्छेद ५८२), न्यायमूर्ती हेगडे आणि मुखर्जी, (परिच्छेद ६३२ आणि ६६१) आणि न्यायमूर्ती जगनमोहन रेड्डी, (परिच्छेद ११५९,११६१)] बहुमताच्या सर्व निकालांमध्ये न्यायिक पुनर्विलोकनाच्या पैलूचा तपशीलवार उल्लेख आढळत नाही. तथापि, न्यायमूर्ती खन्ना यांनी या समस्येकडे स्पष्टपणे लक्ष वेधले (परिच्छेद १५२९ मध्ये):

.....तथापि, न्यायिक पुनर्विलोकनाचे अधिकार हे केवळ आक्षेपित कायदे करताना केंद्र किंवा राज्य विधिमंडळांनी त्यांच्यासाठी आखून दिलेल्या विधिमंडळ याद्यांच्या चौकटीमध्ये काम केले आहे की नाही हे ठरविण्यापुरते मर्यादित नाहीत; कायदे घटनेच्या

इतर तरतुदींचे उल्लंघन करून केले गेले आहेत की नाही या प्रश्नावरही न्यायालये विचार करतात. जोपर्यंत काही मूलभूत अधिकार अस्तित्वात आहेत आणि ते संविधानाचा भाग आहेत, तोपर्यंत त्या अधिकारांनी दिलेल्या हमीचे उल्लंघन होत नाही हे पाहण्याच्या दृष्टीने न्यायिक पुनर्विलोकनाच्या अधिकाराचा देखील वापर केला पाहिजे. .....अशा प्रकारे न्यायिक पुनर्विलोकन हा आपल्या घटनात्मक व्यवस्थेचा अविभाज्य भाग बनला आहे आणि कायद्यांच्या तरतुदींच्या घटनात्मक वैधतेबद्दल निर्णय घेण्याचा अधिकार उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयाकडे निहित करण्यात आला आहे. जर कायद्यातील तरतुदी घटनेच्या कोणत्याही अनुच्छेदाचे उल्लंघन करत असल्याचे आढळून आले, जे की सर्व कायद्यांच्या वैधतेसाठी आधारस्तंभ आहे, तर सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांना उक्त तरतुदी रद्द करण्याचा अधिकार आहे."

६. पुढे असे सादर करण्यात आले की कोणत्याही व्यवहार्य पर्यायी अपील यंत्रणेच्या अभावामुळे घटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत विहित असलेल्या न्यायिक पुनर्विलोकनाचे अधिकार वगळणे स्वीकारले जाऊ नये. हे या आधारावर होतेः सर्वप्रथम, संविधानाचे अनुच्छेद १३६ (२) सशस्त्र बलांशी संबंधित कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याखाली स्थापन केलेल्या न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या आदेशाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यासाठी कोणत्याही विशेष अनुमती याचिकेला परवानगी देत नाही. दुसरे म्हणजे, या कायद्याच्या कलम ३१ मध्ये असे म्हटले आहे की जर "सामान्य जनतेसाठी महत्वाचा कायद्याचा मुद्दा" समाविष्ट असेल तरच या न्यायालयात अपील केले जाईल.

७. अशा प्रकारे, बहुतांश प्रकारणांमध्ये जे सेवा प्रकरणांच्या स्वरूपातील असल्याने पक्षकारांसाठी वैयक्तिक असल्याने आणि त्यात "सामान्य जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचा" कायद्याचा मुद्दा समाविष्ट असू शकत नसल्यामुळे, पक्षकारांकडे अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयात दाद मागण्याव्यतिरिक्त तक्रार निवारणासाठी कोणताही मंच नसतो, जिथे तो सशस्त्र बल न्यायाधिकरणाच्या आदेशाने व्यथित झाल्याने दाद मागू शकतो. याव्यतिरिक्त, या कायद्याच्या कलम १४ चे प्रारुपलेखन करताना विधिमंडळाला घटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत अधिकारक्षेत्राच्या मूलभूततेची जाणीव होती, ज्याद्वारे घटनेच्या अनुच्छेद २२६ आणि अनुच्छेद २२७ अंतर्गत सशस्त्र बल न्यायाधिकरणाकडून उद्भवलेल्या अपीलांवर सुनावणी करण्यासाठी असलेल्या उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राचे स्पष्टपणे रक्षण केल्या जाते.

८. या कायद्याचे कलम १४(१) खालीलप्रमाणे आहे.

"१४. सेवा प्रकरणांमध्ये अधिकारक्षेत्र, अधिकार आणि प्राधिकार.

- (1) या अधिनियमात केलेल्या स्पष्ट तरतुदी व्यतिरिक्त, न्यायाधिकरण सर्व सेवा प्रकरणांच्या संबंधात (सर्वोच्च न्यायालय किंवा घटनेच्या अनुच्छेद २२६ आणि २२७ अंतर्गत अधिकारक्षेत्राचा वापर करणारे उच्च न्यायालय वगळता) सर्व न्यायालयांद्वारे त्या दिवसाच्या तात्काळ आधी वापरण्यायोग्य सर्व अधिकारक्षेत्र, अधिकार आणि प्राधिकाराचा नियुक्त दिवशी आणि तेव्हापासून वापर करेल."

९. विद्वान वकिलांनी असा युक्तिवाद केला की राज्यघटनेचे अनुच्छेद २२६ आणि २२७ हे समान विषयाची प्रकरणे हाताळत नाही आणि त्यामुळे अनुच्छेद २२७(४) अंतर्गत लादलेली मर्यादा राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ पर्यंत वाढवता येऊ शकत नाही. अनुच्छेद २२७(४) "या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे " या वाक्यांशाने सुरू होते. याचा अर्थ तरतुदीतील अधिरोध केवळ त्या अनुच्छेदा पुरता मर्यादित आहे.

१०. अनुच्छेद २२७(४) चे प्रतिरूप करणे फायदेशीर ठरेल, जे खालीलप्रमाणे आहेः

२२७.उच्च न्यायालयाचा सर्व न्यायालयांवर देखरेख करण्याचा अधिकार:-

.....

(४) सशस्त्र सेनांसंबंधीच्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्या अन्वये घटीत केलेल्या कोणत्याही न्यायालयावर किंवा न्यायाधिकरणावर देखरेख करण्याचे अधिकार या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, उच्च न्यायालयास प्रदान होतात असे मानले जाणार नाही"

११. अशा प्रकारे, युक्तिवादासाठीही, जर असे म्हटले गेले असते की अनुच्छेद २२७(४) हे उक्त कायद्याच्या कलम १५[ंं] अंतर्गत लष्करी न्यायालयामधून उद्भवलेल्या प्रकरणांसाठी उच्च न्यायालयाचे देखरेख करण्याचे अधिकार काढून घेते, तर ते लष्करी न्यायालयाशी संबंधित प्रकरणांसाठी अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयांचे अधिकार कमी करणार नाही. कोणत्याही परिस्थितीत, उच्च न्यायालये या कायद्याच्या कलम १५ अंतर्गत आदेशांविरुद्ध रिट याचिकांवर सुनावणी करण्यास अनुत्सुक राहिली आहेत आणि त्यांनी द्वितीय अपील न्यायालय होण्यास नकार दिला आहे.

१२. विद्वान वकिलांनी **एस. एन. मुखर्जी -विरुद्ध- भारताचे संघराज्य**[९] , अधिक विशेषतः परिच्छेद ४२ मधील निरीक्षणांच्या आधारे त्यांचे युक्तिवाद मजबूत केले, ज्यात सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की उच्च न्यायालयांना, अनुच्छेद २२६ अंतर्गत, लष्करी न्यायालयाच्या संदर्भात न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार आहे आणि उच्च न्यायालये योग्य दिलासा देऊ शकतात "जर उक्त कार्यवाहीमुळे राज्यघटनेच्या भाग III अंतर्गत हमी दिलेले मूलभूत अधिकार नाकारले गेले असतील किंवा जर उक्त कार्यवाही अधिकारक्षेत्रातील त्रुटीमुळे किंवा अभिलेखामध्ये स्पष्ट असलेल्या कायद्याच्या कोणत्याही त्रुटीमुळे ग्रस्त असेल तर.

१३. उपरोक्त संदर्भात, **भारताचे संघराज्य आणि इतर -विरुद्ध- मेजर जनरल श्री कांत शर्मा आणि इतर**[१०] या प्रकरणातील या न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाची निरीक्षणे कायद्याच्या सुस्थापित तत्त्वाच्या विरोधात होती आणि त्या निर्णयामुळे भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत सशस्त्र सेना न्यायाधिकरणाकडून उद्भवलेल्या निर्णयांचा आढावा घेण्याच्या उच्च न्यायालयाच्या अधिकारावर संपूर्ण अटकाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला होता. असा संपूर्ण प्रतिबंध हा **एल. चंद्रकुमार**[११] **आणि एस. एन. मुखर्जी**[१२] प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने दिलेल्या निर्णयाच्या विरुद्ध आहे. महत्त्वाचे म्हणजे, **मेजर जनरल श्री कांत शर्मा आणि इतर** [१३] मधील निर्णय हे अवलोकन करण्यात अयशस्वी ठरला की एखाद्या सेवा प्रकरणातील पीडित व्यक्तीला उच्च न्यायालयात जाण्यापासून रोखले गेले तर सर्वोच्च न्यायालयासह कोणत्याही अपील प्राधिकरणात दाद मागण्याचा कोणताही कायदेशीर मार्ग शिल्लक राहणार नाही, कारण सेवा बाबी खाजगी स्वरूपाच्या असतात आणि त्यात घटनेच्या अनुच्छेद १३६(२) सह वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम ३१ अंतर्गत "सामान्य जनतेसाठी महत्वाचा कायद्याचा मुद्दा" समाविष्ट नसतो.

१४. अशा प्रकारे, हे मत **एल. चंद्रकुमार**[१४] मधील सात न्यायाधीशांच्या खंडपीठाच्या निर्णयामधील परिच्छेद ७९ मधील निरीक्षणांशी थेट विरोधाभास असल्याचे म्हटले गेले, जे खालीलप्रमाणे आहेः

"७९. आम्ही असेही मानतो की उच्च न्यायालयांना त्यांच्या संबंधित अधिकारक्षेत्रातील सर्व न्यायालये आणि न्यायाधिकरणांच्या निर्णयांवर न्यायिक पर्यवेक्षण करण्याचा अधिकार

देखील राज्यघटनेच्या मूलभूत संरचनेचा भाग आहे. याचे कारण असे की, ज्या स्थितिविशेष मध्ये उच्च न्यायालयांना घटनात्मक व्याख्येव्यतिरिक्त इतर सर्व न्यायिक कार्यांपासून वंचित ठेवले जाते, ती परिस्थितीही तितकीच टाळली पाहिजे."

१५. शेवटी, **रोजर मॅथ्यू विरुद्ध साऊथ इंडियन बँक लिमिटेड** [१५] या प्रकरणातील या न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाच्या अलीकडील घटनापीठाने दिलेल्या निकालाच्या पार्श्वभूमीवर हे मुद्दे आता नवीन राहिलेले नाहीत, असे सादर करण्यात आले, ज्यामध्ये **एल. चंद्रकुमार** प्रकरणानंतरच्या परिच्छेद २१५ मध्ये, या न्यायालयाने असा निर्णय घेतला की अनुच्छेद २२६ अंतर्गत रिट अधिकारक्षेत्र लष्करी किंवा सशस्त्र दलांच्या वादाविरूद्ध उच्च न्यायालयाचे अधिकार स्पष्टपणे किंवा निहितार्थाने मर्यादित करत नाही आणि अनुच्छेद २२७(४) अंतर्गत निर्बंध हे केवळ उच्च न्यायालयांच्या प्रशासकीय देखरेखीखाली आहे, न्यायिक पुनर्विलोकनाऐवजी नाही. परिच्छेद २१५ खालीलप्रमाणे आहेः-

"२१५. त्यामुळे **एल. चंद्रकुमार**[१६] प्रकरणानंतर हे स्पष्ट झाले आहे की अनुच्छेद २२६ अंतर्गत रिट अधिकारक्षेत्र उच्च न्यायालयांच्या अधिकारांना स्पष्टपणे किंवा लष्करी किंवा सशस्त्र बलांच्या विवादांविरुद्ध निहितार्थाने मर्यादित करत नाही. अनुच्छेद २२७(४) द्वारे मर्यादित व बेदखल केलेले केवळ उच्च न्यायालयाच्या प्रशासकीय देखरेखीखाली चालते आणि न्यायिक पुनर्विलोकनसाठी नाही. अनुच्छेद १३६(२) सशस्त्र बल न्यायाधिकरणांच्या आदेशाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयासमोर थेट अपील करण्यास मनाई करते, परंतु अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयाने केलेल्या न्यायिक पुनर्विलोकनाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यास मनाई करणार नाही."

"भारताचे संघराज्य आणि सशस्त्र दलांच्या जे. ए. जी. (JAG) शाखेचा युक्तिवाद

१६. श्री. संजय जैन आणि कर्नल बालसुब्रमण्यम यांनी असे प्रतिपादित करण्याचा प्रयत्न केला की या कायद्याच्या कलम ३(ओ) चा पहिला अर्धा भाग सशस्त्र बल न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्राला सक्षम मानतो आणि दुसऱ्या भागातील सूचीबद्ध बाबी सशस्त्र बल न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्राला सक्षम मानतो नाहीत. कलम ३(ओ) खालीलप्रमाणे आहेः

"३. व्याख्या. - या कायद्यात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसल्यास,-.

... ...

(ओ) सेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४६), नौसेना अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६२) आणि वायूसेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४५) च्या अधीन असलेल्या व्यक्तीच्या संबंधातील 'सेवा बाबी' म्हणजे त्यांच्या सेवेच्या अटींशी संबंधित सर्व बाबी आणि त्यात

(i) पारिश्रमिक (भत्त्यांसह), निवृत्तीवेतन आणि इतर निवृत्ती लाभा;

(ii) पदावधी, नेमणूक , नियुक्ती, नावनोंदणी, परिवीक्षा, पुष्टीकरण, ज्येष्ठता, प्रशिक्षण, पदोन्नती, प्रत्यावर्तन, मुदतपूर्व निवृत्ती, नियत सेवावधि, सेवा समाप्ती आणि दंडात्मक निगमन;

(iii) बरखास्तीची शिक्षा दिल्या जाणारे संक्षिप्त निकाल आणि खटले;

(iv) इतर कोणतेही प्रकरण यांचा समावेश असेल

परंतु (i) सेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४६), नौसेना अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६२) आणि वायूसेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४५) च्या कलम १८ अंतर्गत जारी केलेले आदेश; आणि

(ii) सेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४६), नौसेना अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६२) आणि वायूसेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४५) च्या अधीन असलेल्या व्यक्तीच्या संबंधात वैयक्तिकरित्या किंवा समूह (युनिट), रचना किंवा जहाजाचा भाग म्हणून जागा किंवा समूह (युनिट) बदलण्यासह बदली आणि नियुक्ती. (

iii) कोणत्याही प्रकारची रजा;

(iv) संक्षिप्त लष्करी न्यायचौकशी, जेथे बडतर्फ करण्याची किंवा तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ तुरुंगवासाची शिक्षा आहे, यांचा समावेश नसेल;

१७ या कायद्याच्या अपीलांशी संबंधित प्रकरण V अंतर्गत कलम ३० आणि ३१ अंतर्गत अपील यंत्रणा देखील प्रदान करण्यात आल्याचे नमूद केले आहे. कलम ३० आणि ३१ खालीलप्रमाणे आहे :-

"३०. सर्वोच्च न्यायालयात अपील. - (१) कलम ३१ च्या तरतुदींना अधीन राहून, न्यायाधिकरणाच्या अंतिम निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरूद्ध (कलम १९ अंतर्गत पारित केलेल्या आदेशाव्यतिरिक्त) सर्वोच्च न्यायालयात अपील केले जाईलः परंतु, असे अपील उक्त

निर्णय किंवा आदेशाच्या नव्वद दिवसांच्या कालावधीत केले जाईलः परंतु, न्यायाधिकरणाच्या वादकालीन आदेशविरूद्ध अपील केले जाणार नाही.

(२) अवमानासाठी शिक्षा करण्याच्या न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्राचा वापर करताना न्यायाधिकरणाच्या कोणत्याही आदेशावरून किंवा निर्णयाच्या अधिकारावरून सर्वोच्च न्यायालयात अपील केले जाईलः परंतु, या पोटकलमांतर्गत सर्वोच्च न्यायालयात, त्या आदेशाविरुद्ध अपील केल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत अपील दाखल केले जाईल.

(३) पोटकलम (२) अन्वये कोणतेही अपील प्रलंबित असताना, सर्वोच्च न्यायालय आदेश देऊ शकेल की-

(अ) शिक्षेची अंमलबजावणी किंवा त्याविरूद्ध अपील केलेला आदेश निलंबित केला जावा; किंवा

(ब) अपीलकर्ता बंदिवासात असल्यास, त्याला जामिनावर सोडण्यात यावे परंतु, जेथे अपीलकर्ता न्यायाधिकरणाचे समाधान करतो की त्याला अपील करायचे आहे, तेथे न्यायाधिकरण प्रकरणानुसार खंड (अ) किंवा खंड (ब) अन्वये प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाराचा वापर करू शकेल.

....

३१. अपील करण्याची अनुमती-(१) सर्वोच्च न्यायालयात अपील करणे न्यायाधिकरणाच्या अनुमतीसह असेल; आणि निर्णयात सामान्य जनतेसाठी महत्वाचा कायद्याचा मुद्दा समाविष्ट आहे असे न्यायाधिकरणाने प्रमाणित केल्याशिवाय किंवा हा मुद्दा त्या न्यायालयाने विचारात घेतला पाहिजे असे सर्वोच्च न्यायालयाला दिसून येत नाही तोपर्यंत अशी अनुमती दिली जाणार नाही.

(२) न्यायाधिकरणाच्या निर्णयाच्या तारखेपासून सुरू होणाऱ्या तीस दिवसांच्या कालावधीत सर्वोच्च न्यायालयात अपील करण्याच्या अनुमतीसाठी न्यायाधिकरणाकडे अर्ज केला जाईल आणि न्यायाधिकरणाने अनुमति साठी अर्ज नाकारल्याच्या तारखेपासून सुरू होणाऱ्या तीस दिवसांच्या कालावधीत सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यासाठी अनुमती अर्ज केला जाईल.

(३) अपील करण्याची अनुमती मिळण्याचा कोणताही अर्ज निकाली लागेपर्यंत आणि अपील करण्याची अनुमती मिळाल्यास, अपील निकाली लागेपर्यंत अपील प्रलंबित मानले जाईल;

आणि अपील करण्याची अनुमती मिळण्याचा अर्ज ज्या कालावधीत केला गेला असेल त्या वेळेच्या समाप्तीवर निकाली काढला गेला असे मानले जाईल, परंतु तो त्या कालावधीत केला असे मानले जात नाही.

१८. आपण येथे हे निदर्शनास आणून दिले पाहिजे की कलम ३० चे वाचन हे दर्शवते की सर्वोच्च न्यायालयात अपील करण्याची तरतूद कलम ३१ च्या तरतुदींच्या अधीन आहे. कलम ३१ अंतर्गत असे अपील सशस्त्र बल न्यायाधिकरणाच्या अनुमतीसह असेल. सशस्त्र बल न्यायाधिकरण अशा निर्णयात सामान्य जनतेसाठी महत्वाचा कायद्याचा मुद्दा समाविष्ट आहे हे प्रमाणित केल्याशिवाय किंवा सर्वोच्च न्यायालयाला असे दिसते की हा मुद्दा असा आहे ज्यावर न्यायालयाने विचार केला पाहिजे असे प्रमाणित केल्याशिवाय अशी अनुमती देणार नाही.

१९. अशा प्रकारे, यात काही शंका नाही की अपील यंत्रणा निर्बंधक स्वरूपाची आहे, सरकारी अभियोक्ता सुद्धा हे नाकारू शकत नाही . पर्याय म्हणून, त्यांनी विनंती केली की जर हे न्यायालय या निष्कर्षावर पोहोचले की अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयाला सशस्त्र दल न्यायाधिकरणाने पारित केलेल्या आदेशांमधून उद्भवलेल्या प्रकारणांचा निपटारा करण्याचे अधिकारक्षेत्र असेल, तर ती प्रक्रिया निर्बंधात्मक स्वरूपाची असावी. या कायद्याच्या कलम ३० आणि ३१ आणि राज्यघटनेच्या अनुच्छेद १३६(२) मध्येही, अपील करण्याची परवानगी देताना असे निर्बंध घालण्यात आले आहेत.

२०. विद्वान वकिलांनी खालील प्रकरणांमध्ये राज्यघटनेच्या कलम २२६ अंतर्गत अधिकारक्षेत्राचा वापर करणाऱ्या उच्च न्यायालयाला निर्बंध करण्याची मागणी केली:

i) चौकशी न्यायालये, न्यायालये, लष्करी न्यायालय आणि शिस्त यांच्याशी संबंधित सर्व प्रकरणे;

ii) निवृत्तिवेतन आणि इतर निवृत्ती लाभ, कार्यकाळ, पदोन्नती, निवृत्ती, प्रशासकीय सेवा समाप्तीशी संबंधित सर्व प्रकरणे, जसे की नैतिक अधोगती आणि रजेशी संबंधित प्रकरणे;

iii) शासकीय गुपिते अधिनियम कायद्याशी संबंधित बाबी; आणि

iv) हेरगिरी/घातपात यांच्याशी संबंधित प्रकरणे.

२१. असे सादर करण्यात आले की लष्करी न्यायालयासह सर्व शिस्तभंगाची प्रकरणे, जी पुराव्याचे पुनःविवेचन करणे अनिवार्य करू शकतात, ती उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राच्या वापराच्या कक्षेतून बाहेर ठेवली जावी. ते दुसरे फौजदारी अपील असू शकते.

२२. एक अतिरिक्त युक्तिवाद करण्यात आला होती की, सध्याच्या निकालात जे काही नमूद केले गेले आहे, ते सर्वोच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र कमकुवत करण्यासारखे मानले जाऊ नये, जे की अबाधित राहील. अशा प्रकारे, उच्च न्यायालयाच्या रिट अधिकारक्षेत्रातील प्रकरणांच्या विशिष्ट श्रेणीच्या निर्णयाच्या संदर्भात हे निरीक्षण केवळ न्यायाचे सुरळीत प्रशासन सुलभ करण्यासाठी होते.

२३. शेवटी, सशस्त्र बल न्यायाधिकरणाचे स्वरूप लक्षात ठेवले पाहिजे, जे अनुच्छेद ३२३ ए अंतर्गत सामान्य प्रशासकीय न्यायाधिकरणापेक्षा किंवा घटनेच्या अनुच्छेद ३२३ बी अंतर्गत इतर न्यायाधिकरणांपेक्षा वेगळे आहे आणि अशा प्रकारे, उच्च न्यायालयाने अनुच्छेद २२६ अंतर्गत सशस्त्र बल न्यायाधिकरणाच्या आदेशांमध्ये नियमितपणे हस्तक्षेप करू नये, जे केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणासारखे अधिकारक्षेत्र वापरण्याची मागणी करतात.

<u>आमची निरीक्षणेः</u>

२४. सशस्त्र बल न्यायाधिकरणाचे महत्त्व आणि त्याचे अधिकारक्षेत्र इतर न्यायाधिकरणांपेक्षा वेगळे असणे, यावर विद्वान एडिशनल सॉलिसिटर जनरल यांनी जोर दिलेला शेवटचा पैलू लक्षात घेऊन आम्ही या प्रकरणाचा विचार केला आहे. सशस्त्र बलांनी बजावलेल्या भूमिकेचे महत्त्व आणि या सेवांसाठी आवश्यक असलेल्या शिस्त पातळीची आम्हाला जाणीव आहे. अशा प्रकारे, अनेकदा इतर न्यायाधिकरणांची अनेक न्यायशास्त्रीय तत्त्वे सशस्त्र बल न्यायाधिकरणाच्या निर्णयांमध्ये समाविष्ट केली जाऊ शकत नाहीत. सशस्त्र बलांचे स्वतःचे नियम आणि कार्यपद्धती असतात आणि सशस्त्र बलांच्या निकषांनुसार अधिकारक्षेत्राचा योग्य वापर होत असल्यास, सशस्त्र बलांनी बजावलेल्या भूमिकेचे महत्त्व लक्षात घेऊन, त्यात हस्तक्षेप करताना उच्च न्यायालय किंवा ह्या न्यायालयाने सावधगिरी बाळगली आहे .

२५. आम्ही उपरोक्त तत्त्वाशी सहमत असलो तरी, **मेजर जनरल श्री कांत शर्मा आणि इतर**[१७] यांच्या प्रकरणातील निरीक्षणांचे आम्ही विवेचन करू शकत नाही, ज्याने घटनेच्या कलम २२६ अंतर्गत अधिकारक्षेत्राच्या वापरावर निर्बंध घालण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे राज्यघटनेची एक अतिशय महत्त्वाची तरतूद कमकुवत झाली जी मूलभूत संरचनेचा भाग देखील आहे. मूलभूत संरचनेची तत्त्वे काळाच्या कसोटीवर टिकून राहिली आहेत आणि अनेक न्यायिक अधिघोषणांमध्ये निर्णायक चाचणी म्हणून त्यावर जोर दिला आहे. ही शंका घेण्यासारखी गोष्ट नाही. ही स्थिती असल्याने, न्यायाधिकरणाच्या आदेशावरून उद्भवलेल्या निर्णयाचा न्यायिक पुनर्विलोकन करताना राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत दिलेल्या या अधिकारक्षेत्राचा वापर करण्यासाठी उच्च न्यायालयाला अटकाव निर्माण करणे हे राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयाने स्वनियंत्रण ठेवणे या पेक्षा काहीसे वेगळे आहे.

२६. विधिमंडळाने 'न्यायाधिकरण' ही संकल्पना सादर केल्यावर (एखादी व्यक्ती असे म्हणू शकते की या संकल्पनेने वेगवेगळ्या न्यायाधिकरणांच्या संबधात अनेक प्रश्नचिन्ह बघितले आहेत, जरी त्यायोगे काही यश देखील मिळवले आहे), **एल. चंद्रकुमार**[१८] प्रकरणात या न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर त्याची चाचणी घेण्यात आली. अशा प्रकारे, अनुच्छेद ३२३ ए किंवा अनुच्छेद ३२३ बी अंतर्गत "न्यायाधिकरण" ची तत्त्वे कायम ठेवत असताना, न्यायाधिकरणांचे निर्णय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राच्या अधीन असतील आणि ४८ व्या घटनादुरुस्तीद्वारे प्रतिबंधित केले जाणार नाहीत, ज्याद्वारे उपरोक्त दोन अनुच्छेद सादर केले. त्यामुळे, आमच्या दृष्टीने, हे प्रकरण शांत व्हायला हवे होते आणि सातपेक्षा कमी न्यायाधीशांच्या कोणत्याही खंडपीठाने या प्रस्तावावर शंका घ्यायला नको होती. **मेजर जनरल श्री कांत शर्मा आणि इतर**[२०] प्रकरणातील निरीक्षणांमुळे **रोजर मॅथ्यू**[१९] प्रकरणातील सशस्त्र दल न्यायाधिकरणातील पाच न्यायाधीशांच्या खंडपीठातील निरीक्षणांची निर्माण झाली. अशा प्रकारे, याचा पुनरुच्चार केला जातो आणि स्पष्ट केले जाते की अशा प्रकारे, याचा पुनरुच्चार केला जातो आणि स्पष्ट केले जाते की राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत उच्च न्यायालयाचे अधिकार हे अनुच्छेद २२७

द्वारा बाधित व अधिक्षित आणि नियंत्रित करता येत नाही हे अधिकार अनुच्छेद २२६ अंतर्गत न्यायिक पुनर्विलोकनाच्या अधिकारांपेक्षा काहीसे वेगळे आहेत.

२७. **लेफ्टनंट कर्नल पृथ्वीपाल सिंग बेदी**[२१] प्रकरणातील इतर गोष्टींबरोबरच सर्वोच्च न्यायालयाची पूर्वीची निरीक्षणे लक्षात घेऊन हा कायदा विचारार्थ मांडण्यात आला होता, परंतु विविध सशस्त्र बलांना लागू असलेल्या नियमांमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रशासकीय/शिस्तभंगाच्या निर्णयाच्या विरोधात न्यायाधिकरणाने एकच न्यायिक फेरविचार करण्याची तरतूद करण्यात आली आहे, या खाजगी पक्षकार (प्रायव्हेट पार्टी) च्या युक्तिवादातही आम्हाला योग्यता आढळते. या कायद्याचे कलम ३१ निःसंशयपणे प्रतिबंधात्मक स्वरूपाचे आहे कारण सर्वोच्च न्यायालयात अपील केवळ सामान्य सार्वजनिक महत्त्वाच्या कायद्याच्या मुद्द्यावर असते. विद्वान वकिलांनी अशी बाजू मांडली की, असे अनेक मुद्दे आहेत जे समोर आले आहेत, जे वैयक्तिक स्वरूपाचे आहेत आणि मोठ्या सार्वजनिक महत्त्वाच्या समस्या उपस्थित करत नाहीत.

२८. सशस्त्र बल न्यायाधिकरणाच्या निर्मितीपूर्वी, अनुच्छेद २२६ अंतर्गत अधिकारक्षेत्राचा वापर करून हे प्रकरणं हाताळण्याचा काहीसा अनुभव असलेने आपण असे म्हणू शकतो की निवृत्तिवेतनाच्या संबंधीची प्रकरणे मोठ्या संख्येने दाखल होत असत. सशस्त्र बलात सेवा केलेल्या व्यक्तीना निवृत्तिवेतनाच्या टप्प्यावर बाजूला सारून देण्यात आले होते. हे अधिकारक्षेत्र सशस्त्र बल न्यायाधिकरणाकडेही आहे. निवृत्तिवेतनाच्या प्रकरणांत मोठे लोकहित असेल असे म्हणणे कठीण आहे , परंतु त्या संबंधित व्यक्तीसाठी ते खूप महत्वाचे आहे. अनुच्छेद २२६ अंतर्गत अधिकारक्षेत्राचा वापर करताना, सशस्त्र दल न्यायाधिकरणाने केलेल्या चुकीमध्ये दुरुस्ती करण्यास उच्च न्यायालयाला मज्जाव करणे हे घटनात्मकतेच्या विरोधात आहे. प्रथम स्वतंत्र न्यायिक छाननी ही केवळ सशस्त्र दल न्यायाधिकरणाद्वारेच केली जाते. काही प्रकरणांमध्ये न्यायिक परिनिरीक्षण हे दुसरे अपील करण्यासारखे आहे असे म्हणणे, हे त्याकडे पाहण्याचा योग्य मार्ग नसेल. हे लक्षात ठेवायला पाहिजे की प्रशासकीय न्यायशास्त्रात किमान दोन स्वतंत्र न्यायिक छाननऱ्या नाकारल्या जाऊ नयेत. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना अफाट अनुभव असतो. कलम २२६ अंतर्गत अधिकारक्षेत्राच्या कोणत्याही वापरामध्ये, उच्च न्यायालये अधिकारक्षेत्राच्या व्याप्ती आणि स्वरूपाबद्दल अगदी जागरूक असतात, जे त्या प्रकरणाच्या स्वरूपावर अवलंबून असते.

२९. एडिशनल सॉलिसिटर जनरल यांनी सुचवल्याप्रमाणे, राज्यघटनेच्या कलम २२६ अंतर्गत न्यायिक पुनर्विलोकनाच्या कक्षेतून काही प्रकरणे वेगळे करण्याची आवश्यकता नाही, असे आम्हाला वाटते. **एस. एन. मुखर्जी**[२३] प्रकरणातील घटनापीठाने दिलेल्या निकालात असे स्पष्ट करण्यात आले होते की, लष्करी न्यायालयच्या संदर्भातही, उच्च न्यायालय त्यात अभिप्रेत असल्याप्रमाणे विशिष्ट परिस्थितीत योग्य दिलासा देऊ शकते, म्हणजे, "जर उक्त कार्यवाहीमुळे संविधानाच्या भाग ३ अंतर्गत हमी दिलेले मूलभूत अधिकार नाकारले गेले असतील किंवा जर उक्त कार्यवाही अधिकारक्षेत्रातील त्रुटीमुळे किंवा अभिलेखामध्ये दिसणाऱ्या कायद्याच्या कोणत्याही त्रुटीमुळे ग्रस्त असेल तर."

३०. वरील स्थितीत एखादा पक्षकार दिलासा मिळण्यापासून पासून वंचित राहत असेल तर अशी परिस्थिती न्यायालय कसे चालवून घेईल ? या न्यायालयाने याउलट काही बोलणे किंवा एस. एन. मुखर्जी प्रकरणातील घटनापीठाने दिलेल्या निकालात नमूद केलेल्या उपरोक्त निरीक्षणावर निर्बंध घालणे कायदेशीर किंवा योग्य ठरणार नाही. आम्ही कोणतेही असे अपवाद तयार करण्यास तयार नाही, ज्यात एडिशनल सॉलिसिटर जनरल यांनी वर नमूद केलेल्या गोष्टींचा समावेश आहे, कारण प्रकरणाचे स्वरूप विचारात न घेता, जर संविधानाच्या भाग ३ अंतर्गत मूलभूत अधिकार नाकारला गेला असेल किंवा अभिलेखामध्ये अधिकारक्षेत्रातील त्रुटी किंवा त्रुटी स्पष्ट असेल तर उच्च न्यायालय आपल्या अधिकारक्षेत्राचा वापर करू शकते. उच्च न्यायालय पुराव्यांचे पुन्हा विवेचन करेल ज्यामुळे ते दुसरे अपील वगैरे होईल अशी चुकीची कल्पना असल्याचे दिसते . या न्यायालयाचा असा विश्वास आहे की उच्च न्यायालये कोणत्या निकषांनुसार अधिकारक्षेत्राचा वापर करायचे आहेत याबद्दल अगदी जागरूक आहेत आणि त्या तत्त्वांचाही या न्यायालयाने आधीच उल्लेख केला आहे.

३१. सध्याच्या निकालात आम्ही केलेल्या निरीक्षणांच्या आधारे, कायद्यांतर्गत किंवा घटनात्मक योजने मध्ये अपेक्षित केल्याप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र कमकुवत होण्याची भीती का असावी हे देखील आम्ही समजून घेण्यात अपयशी ठरतो.

<u>निष्कर्ष -</u>

३२. आम्हाला असा निष्कर्ष काढण्यात अजिबात संकोच वाटत नाही की **मेजर जनरल श्री कांत शर्मा आणि इतर**[२४] प्रकरणातील निकालात योग्य कायदा विहित करण्यात आला नाही आणि सदर निकाल **एल. चंद्रकुमार**[२५] प्रकरण, **एस. एन. मुखर्जी**[२६] प्रकरण आणि **रोजर मॅथ्यू**[२७] प्रकरणासह आधी आणि नंतर देण्यात आलेल्या घटनापीठांच्या निकालांशी विसंगत आहे, सदर प्रकरणांमध्ये हे अतिशय स्पष्टपणे नमूद केले होते की उच्च न्यायालयाद्वारे राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत मिळालेल्या अधिकाराच्या वापरावर कोणतेही निर्बंध नाहीत-तथापि, स्व-शिस्तीच्या प्रकरणांच्या संदर्भात, सर्वोच्च न्यायालयाने आधीच तत्त्वे स्पष्ट केली आहेत.

३३. आतापर्यंत आपण सार्वत्रिक विधाने हाताळल्यानंतर, वैयक्तिक प्रकरणांकडे वळू कारण त्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या आदेशांची आवश्यकता असू शकते. वस्तुतः, विद्वान वकील श्री. के. परमेश्वर यांनी प्रकरणांची आणि मागणी केलेल्या आदेशांचे स्वरूप यांची यादी देखील तयार केली आहे आणि ती खालीलप्रमाणे दिली आहेः

I. खटल्यांची पहिली श्रेणी अशी आहे, ज्यात संबंधित अधिकारक्षेत्रातील उच्च न्यायालयांनी गुणवत्तेनुसार प्रकरणांची सुनावणी केली होती, परंतु **मेजर जनरल श्री कांत शर्मा आणि इतर**[२८] प्रकरणातील निकाल लक्षात घेता ते दाखल करून घेण्यायोग्य नाही म्हणून निकाली काढले गेले. हे सामान्य लोकांसाठी महत्वाच्या कायद्याचे मुद्दे उपस्थित करणारे विषय नाहीत आणि राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत प्रत्येक उच्च न्यायालयाद्वारे गुणवत्तेच्या आधारे त्यांची छाननी करावी लागेल. त्यामुळे या बाबी गुणवत्तेवर निर्णय घेण्यासाठी संबंधित उच्च न्यायालयांकडे पाठवणे आवश्यक आहे. प्रकरणांची संख्या आणि पक्षांची नावे खालीलप्रमाणे आहेतः

i . एस. एल. पी. (सी) क्र. २०७२१/२०१५ शीर्षक दक्षिणा कुमारी-विरुद्ध-भारताचे संघराज्य

ii . एस. एल. पी. (सी) क्र. १७३२०/२०१७ शीर्षक के. सी. शिबू -विरुद्ध- भारताचे संघराज्य

iii. . एस. एल. पी. (सी) क्र. २०४९९/२०१५ शीर्षक कृष्ण नंदन मिश्रा-विरुद्ध-भारताचे संघराज्य

iv. एस. एल. पी. (सी) क्र. २६६१७/२०१५ शीर्षक नंदलाल वर्मा -विरुद्ध- भारताचे संघराज्य

v. एस. एल. पी. (सी) क्र. २६५६८/२०१५ शीर्षक रणदीप सिंग गुलेरिया -विरुद्ध- भारताचे संघराज्य

vi. एस. एल. पी. (सी) क्र. २६६२०/२०१५ शीर्षक गोपी राम -विरुद्ध- भारताचे संघराज्य.

vii. एस. एल. पी. (सी) क्र. ३६३८६/२०१५ शीर्षक अवि चंदेर सुद -विरुद्ध- भारताचे संघराज्य.

viii. एस. एल. पी. (सी) क्र. ५१११/२०१६ शीर्षक गुरचरण सिंग -विरुद्ध- भारताचे संघराज्य; एस. एल. पी. (सी) क्र. २८१०१/२०१६ शीर्षक निर्मल सिंग -विरुद्ध- भारताचे संघराज्य.

ix. एस. एल. पी. (सी) क्र. १७८८/२०२३ शीर्षक देविंदर सिंग -विरुद्ध- भारताचे संघराज्य.

II. एस. एल. पी. (सी) क्र. ३४७९७/२०१४ शीर्षक भारताचे संघराज्य- विरुद्ध -परशोतम दास, जे उत्तरवादींना दिलासा देणाऱ्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या गुणवत्तेवर भारताचे संघराज्याने दाखल केले होते. या न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने गुणवत्तेनुसार या प्रकरणाचा विचार करावा लागेल.

III. भारतीय संघराज्य.- वि.- थॉमस वैद्यन एम. या शीर्षकाच्या दिवाणी अपीलमध्ये भारतीय संघराज्यने थेट या न्यायालयाला किंवा केवळ उच्च न्यायालयासमोर आव्हान दिले जाईल की नाही याबद्दल मोठ्या खंडपीठाकडे संदर्भ मागितला. सशस्त्र सेना न्यायाधिकरणाच्या आदेशांविरोधात राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत दाखल केलेल्या याचिका कायम राखण्यायोग्य असल्याने, हे प्रकरण गुणधर्मांवर निर्णय घेण्यासाठी उच्च न्यायालयात पाठवणे देखील आवश्यक आहे कारण हा वादीसाठी वैयक्तिक सेवा विषय आहे आणि त्यात सामान्य लोकांसाठी महत्वाच्या कायद्याचा मुद्दा समाविष्ट नाही.

IV. या कायद्याच्या कलम ३१ आणि ३२ च्या अधिकारांना डब्ल्यू.पी.(सी)WP(C) क्र.७६/२०१६ मध्ये आव्हान देण्यात आले होते, ज्याचे शीर्षक होते गुरबक्स सिंग ढिंढसा विरुद्ध भारतीय संघराज्य, जे जम्मू आणि काश्मीरमधील कार्यक्षेत्रात मारल्या गेलेल्या हवाई दलाच्या अधिकाऱ्याच्या वडिलांनी राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ अंतर्गत दाखल केले होते. ते सशस्त्र बल न्यायाधिकरणाने दिलेल्या दिलासाबाबत व्याज मागत होते, परंतु हे प्रकरण

वादीसाठी वैयक्तिक असल्याने आणि त्यात सामान्य लोकांसाठी महत्वाच्या कायद्याचा कोणताही मुद्दा समाविष्ट नसल्यामुळे थेट अपील दाखल करू शकत नव्हते आणि **मेजर जनरल श्री कांत शर्मा आणि इतर**[९] प्रकरणातील निकालाच्या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालये प्रकरणे दाखल करून घेत नव्हती.

अनुच्छेद २२६ अंतर्गत रिट अधिकारक्षेत्र कायम राखण्यायोग्य असल्याचे मानले गेल्यास कलम ३० आणि ३१ हे अधिकारबाह्य म्हणून घोषित करण्याच्या विनंतीवर दबाव आणला जाणार नाही आणि अशा प्रकारे, उच्च न्यायालयात जाण्याच्या स्वातंत्र्यासह हे प्रकरण निकाली काढण्याची विनंती करण्यात आली होती. त्यानुसार आम्ही युक्तिवाद स्वीकारून आदेश पारित करतो.

३४. महत्वाच्या प्रश्नाचे उत्तर देण्यात आले आहे आणि आम्ही दिलेल्या उपरोक्त निर्देशांनुसार, प्रत्येक प्रकरणाच्या तथ्यांनुसार उपरोक्त वैयक्तिक प्रकरणे हाताळल्या जातील.

३५. अपील आणि रिट याचिका उपरोक्त अटींच्या अधीनराहून निकाली काढण्यात आल्या आहेत आणि पक्षकारांनी त्यांचा स्वतःचा खर्च स्वतः करावा.

तळटीपा :-

[१] (१९८२) ३ एस. सी. सी १४०

[२] (१९९७) ३ एससीसी २६१

[३] ३२३ अ. प्रशासकीय न्यायाधिकरणे

[४] ३२३ ब. इतर बाबींसाठी न्यायाधिकरणे.

[५] (उपरोल्लेखित)

[६] एआयआर १९७३ एस. सी. १४६१

[७] (उपरोल्लेखित)

[८] लष्करी न्यायालय विरुद्ध अपील करण्याच्या प्रकरणांमध्ये अधिकारक्षेत्र, अधिकार आणि प्राधिकार (१९९०)

[९] (१९९०) ४ एस. सी. सी ५९४

[१०] (२०१५) ६ एस. सी. सी. ७७३

[११] (उपरोल्लेखित)

[१२] (उपरोल्लेखित)

[१३] (उपरोल्लेखित)

[१४] (उपरोल्लेखित)

[१५] (२०२०) ६ एससीसी १

[१६] (उपरोल्लेखित)

[१७] (उपरोल्लेखित)

[१८] (उपरोल्लेखित)

[१९] (उपरोल्लेखित)

[२०] (उपरोल्लेखित)

[२१](उपरोल्लेखित)

[२२](उपरोल्लेखित)

[२३](उपरोल्लेखित)

[२४](उपरोल्लेखित)

[२५](उपरोल्लेखित)

[२६](उपरोल्लेखित)

[२७](उपरोल्लेखित)

[२८](उपरोल्लेखित)

[२९](उपरोल्लेखित)

<u>अस्वीकरण</u>

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबाजवणीकरीता वैध मानला जाईल."